## पालकमंत्री शेत /पांदण रस्ते योजने अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील पांदण रस्त्यांचे कामे करणेबाबत

शेत पांदण रस्ते प्रामुख्याने शेतीमधील कामाकरीता आवश्यक असणाऱ्या साधनांची ने-आण करण्याकरीता उपयोगात येतात. शेत रस्ते हे रस्ते योजनांमध्ये येत नसल्याने विविध स्त्रोतामधून निधीच्या उपलब्धतेबाबत अडचणी निर्माण होतात. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील पांदण रस्ते पूर्ण करण्याचे हेतुने पालकमंत्री शेत / पांदण रस्ते योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे व याबाबतच्या प्रस्तावास मा. मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. सदर योजने अंतर्गत अ, ब व क वर्गवारीतील पांदण रस्त्याचे काम करणे प्रस्तावित असुन, सदर पांदण रस्त्याच्या माती उत्खननाकरीता उपयोगात येणाऱ्या **संयंत्र, पाण्याचे टँकर व रोडरोलर यांचे प्रती तास (डिझेलसह) दर निश्चित करण्यात आले असुन, ते खालील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | विवरण | दर प्रती तास |
|---|---|---|
| १ | ७० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले जे.सि.बि. इत्यादी अर्थमुव्हर | ९५०/- |
| २ | २०० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले पोकलेन इत्यादी अर्थमुव्हर | १९९५/- |
| ३ | रोडरोलर | ६९१/- |
| ४ | पाणी टँकर | ६००/- |

अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यामध्ये पालकमंत्री शेत / पाणंद रस्ते योजने अंतर्गत करण्यात येणाऱ्या पाणंद रस्त्याकरीता वरील दर ग्राह्य धरण्यात येत असुन, वरिल दरानुसार काम करण्यास ईच्छूक असणाऱ्या कंत्राटदारांनी या कार्यालयासोबत अटी व शर्तीच्या अधिन राहून करारनामा करण्याकरीता उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या कार्यालयात संपर्क करावा.

**जिल्हाधिकारी, अमरावती**